<u>अर्थसंकल्पीय अनुदान सन २०१५-१६</u>
मागणी क्र एल-५,लेखाशिर्ष " ३६०४- स्थानिक संस्था व पंचायत राज संस्था यांना नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे. १०१, जमीन महसूल (०१) (०१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ व मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ अन्वये जिल्हा परिषद व पंचायत समिती व ग्रामपंचायतींना जमीन महसूल, जमीन समानीकरण व उपकर अनुदान इत्यादी संबंधात अभिहस्तांकित रकमा देणे. (३६०४०४७९).
<u>ग्राम पंचायतीना जमीन महसूल अनुदाने</u>

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः अर्थसं २०१५/प्र.क्र.२३ /वित्त-२

बांधकाम भवन इमारत- २५, मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई-४०० ००१
तारीख: १९ जानेवारी, २०१६

<u>वाचा -</u>

१) **शासन निर्णय क्रमांकः** ग्राम विकास विभाग क्र. व्हीपीएम १३७८/१२७७/सीआर ११६३/२४, दि. २२.४.१९९२
२) **शासन निर्णय क्रमांकः** ग्राम विकास विभाग क्र. अर्थसं-२०१५ / प्र.क्र. २३ / वित्त-२, दि. १४ मे, २०१५

शासन निर्णय-

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम १३१ व १३२ (अ) मधील तरतुदीनुसार ग्रामपंचायतींना जमीन महसूल व जमीन समानीकरण अनुदाने वितरीत करण्याबाबतची सुधारीत कार्यपध्दती शासनाचे दिनांक २२ एप्रिल १९९२ च्या शासननिर्णयान्वये विहित करण्यात आली आहे. सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षाकरिता ग्रामपंचायतींना जमीन महसूल अनुदान (३६०४०४७९) या अनुदानाकरिता रु.११,४२,८०,०००/- (अक्षरी रुपये अकरा कोटी बेचाळीस लक्ष ऐंशी हजार फक्त) एवढी अर्थसंकल्पिय तरतूद करण्यांत आली आहे.

१. वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१५/ प्र. क्र. ८५ / अर्थसंकल्प-३ दि. १२ जानेवारी, २०१६ च्या परिपत्रकान्वये अर्थसंकल्पीय तरतुदीच्या ८५ % च्या मर्यादेत वितरणास मान्यता देण्यात आली आहे. यापूर्वी अर्थसंकल्पीय तरतूदीपैकी ७०% च्या मर्यादेत रु. ७,९९,९६,०००/- इतके अनुदान अर्थसंकल्पीय तरतुदीपैकी वितरण प्रणालीवर (BEAMS) संदर्भ क्र.२ अन्वये वितरीत केले आहे. आता अर्थसंकल्पीय तरतूदीपैकी १५ % च्या मर्यादेत **रु. १,७१,४२,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी एकाहत्तर**

लक्ष बेचाळीस हजार फक्त) इतके अनुदान अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर (BEAMS) उपलब्ध करून देण्यास व वितरित करण्यास वित्त विभागाच्या सदर परिपत्रकान्वये अनुमती देण्यात आली आहे. सदर अनुदान ग्रामपंचायतींना जमीन महसूल अनुदान देण्यासाठी सोबत जोडलेल्या विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे विभागीय आयुक्तांकडे संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना, ग्रामपंचायतींना जमीन महसूल अनुदान मंजूर करणे शक्य व्हावे म्हणून सुपूर्द करण्यात येत आहे.

२. विभागीय आयुक्तांनी या शासन निर्णयान्वये मंजूर केलेली अनुदाने संबंधित जिल्हाधिका-यांकडे ग्रामपंचायतींना मंजूर करण्यासाठी त्वरित सुपूर्द करावी व वाटप केलेल्या आदेशांच्या प्रती शासनाकडे पाठवाव्यात. जिल्हाधिकारी यांनी निर्णयात मंजूर केलेल्या तरतूदीपेक्षा जादा खर्च होणार नाही, याबाबत दक्षता घ्यावी.

३. खर्चाचा मेळ घालण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी खर्चाची विवरणपत्रे विभागीय आयुक्तांना पाठवावीत. विभागीय आयुक्तांनी त्या खर्चाचे महालेखापाल महाराष्ट्र १ व २ मुंबई / नागपूर या कार्यालयाशी ताळमेळाचे काम करावे व त्याबाबतचा अहवाल शासनाकडे पाठवावा.

४. यासाठी होणारा खर्च मागणी क्र एल-५ लेखाशिर्ष "३६०४" स्थानिक संस्था व पंचायत राज संस्था यांना नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे, १०१ जमीन महसूल ,(०१) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम १९६१ व मुंबई ग्रामपंचायत अधिनियम ,१९५८ यांच्या तरतूदी अन्वये जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायती यांना अभिहस्तांतरीत रकमा देणे (०१)(०१)जमीन महसूल, जमीन समानीकरण व उपकर वसुली इत्यादीसाठी (३६०४०४७९)(दत्तमत)(योजनेतर)या लेखाशिर्षाखाली टाकण्यात यावा व तो उपरोक्त लेखाशिर्षाखाली सन २०१५-१६ या वित्तीय वर्षात मंजूर केलेल्या अर्थसंकल्पिय तरतूदीतून भागविण्यात यावा.

५. हे अनुदान शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्देशित केलेल्या विहित अटी व शर्तीच्या अधीन राहील.

६. हा निधी ज्या प्रयोजनांसाठी देण्यात येतो त्या प्रयोजनासाठीच खर्च करण्यात यावा यांची दक्षता घेण्यात यावी. तसेच वितरीत निधीच्या खर्चाचा तपशील प्रत्येक महिन्याच्या ३० तारखेपर्यंत शासनास निश्चितपणे सादर करावा. सदर अनुदान विहित कालावधीत खर्च न झाल्यास संबंधितांना जबाबदार धरण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

७. हा शासन निर्णय वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थसंकल्प-३ दि.१२/०१/२०१६ मधील तरतुदीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०११९११३००४०४२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pandurang Rawaji Khotare

Digitally signed by Pandurang Rawaji Khotare
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Section Officer, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=241eb93ab449def8114b5fbff2ea51ab0f16e0092f0102aa9502d0457228dd65, cn=Pandurang Rawaji Khotare
Date: 2016.01.19 13:16:23 +05'30'

(पां.रा. खोटरे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) महालेखापाल, महाराष्ट्र -१ , मुंबई (लेखापरिक्षा) (५ जादा प्रतीसह)
२) महालेखापाल, महाराष्ट्र -१, मुंबई (लेखा व अनुज्ञेयता)(५ जादा प्रतीसह)
३) महालेखापाल , महाराष्ट्र -२, नागपूर (लेखा परिक्षा) (५ जादा प्रतीसह)
४) महालेखापाल , महाराष्ट्र -२, नागपूर(लेखा व अनुज्ञेयता)(५ जादा प्रतीसह)
५) विभागीय आयुक्त (सर्व)
६) जिल्हाधिकारी (सर्व)
७) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
८) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
९) सर्व जिल्हा परिषदांचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी
१०) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्यलेखा व वित्त अधिकारी
११) सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेमार्फत.
१२) मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, वाशी, नवी मुंबई
१३) उप मुख्य लेखापरिक्षक,स्थानिकनिधीलेखा,कोकण(वाशी/पुणे/नाशिक/ अमरावती/ औरंगाबाद/नागपूर)
१४) महसूल व वन विभाग
१५) वित्त विभाग, कार्या.(व्यय -१५) व (अर्थसंकल्प -१७)
१६) कार्यासन अधिकारी, ग्राम विकास व जलसंधारण विभाग (का.क्र. वित्त-१, वित्त -७, वित्त -८)
१७) निवड नस्ती (का.क्र. वित्त-२) ग्राम विकास व जलसंधारण विभाग

विवरणपत्र

मागणी क्र. एल-५ लेखाशीर्ष - स्थानिक संस्था व पंचायत राज संस्था यांना नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे, **ग्रामपंचायतींना जमीन महसुल अनुदान (३६०४०४७९)** या उपलेखाशीर्षाखाली सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षाकरीता मंजूर केलेले अनूदान

(शासन निर्णय क्रमांक : अर्थसं -२०१५ /प्र.क्र.२३ /वित्त-२, दिनांक :- १९ जानेवारी, २०१६चे सहपत्र)

(रक्कम /रुपयांत)

अ. क्र.	विभागीय आयुक्तांचे नांव	सन २०१५-१६ या वित्तीय वर्षाकरीता मंजूर अंदाजपत्रकीय तरतूद.	दिनांक १४/०५/२०१५ च्या शासन निर्णयान्वये वितरीत तरतूद	या शासन निर्णयाअन्वये मंजूर केलेले अनुदान	अक्षरी	या शासन निर्णयापर्यत मंजूर केलेले अनुदान
१	२	३	४	५	६	७
१	कोकण विभाग, कोकण.	९४१३७१०	६४३९०९४	१४८७३०८	रुपये चौदा लक्ष सत्त्याऐंशी हजार तीनशे आठ फक्त	७९२६४०२
२	नाशिक विभाग, नाशिक.	१६२०६०००	१४७६५०९०	७२०४५५	रुपये सात लक्ष वीस हजार चारशे पंचावन्न फक्त	१५४८५५४५
३	पुणे विभाग, पुणे.	६४९०८८१५	४३६६९५०६	१०६१९६५५	रुपये एक कोटी सहा लक्ष एकोणीस हजार सहाशे पंचावन्न फक्त	५४२८९१६१
४	औरंगाबाद विभाग, औरंगाबाद.	९११६८९५	६९५२९६८	१०८१९६४	रुपये दहा लक्ष ऐक्याऐंशी हजार नऊशे चौसष्ट फक्त	८०३४९३२
५	अमरावती विभाग, अमरावती,	६५५९५८०	४३७८१४५	१०९०७१८	रुपये दहा लक्ष नव्वद हजार सातशे अठरा फक्त	५४६८८६३
६	नागपूर विभाग, नागपूर.	८०७५०००	३७९११९७	२१४१९००	रुपये एकवीस लक्ष एकेचाळीस हजार नऊशे फक्त	५९३३०९७
	एकूण	**११४२८००००**	**७९९९६०००**	**१७१४२०००**	रुपये एक कोटी एकाहत्तर लक्ष बेचाळीस हजार फक्त	९७१३८०००

Pandurang Rawaji Khotare

Digitally signed by Pandurang Rawaji Khotare
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Section Officer, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=241eb93ab449def8114b5fbff2ea51ab0f16e0092f0102aa9502d0457228dd65, cn=Pandurang Rawaji Khotare
Date: 2016.01.19 13:16:51 +05'30'

(पां.रा.खोटरे)

कक्ष अधिकारी,महाराष्ट्र शासन